दिः 05 फेब्रुवारी,2014

# काय पंतप्रधानांनी कोलेजियमला समाप्त केले आहे का?

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते, राज्यसभा

अनेक सार्वजनिक पदांकरिता नियुक्ती करतेवेळी अशी अपेक्षा केली जाते की त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाणार नाही. सरकार एक राजनैतिक संस्था आहे. सरकारमध्ये राजनैतिक प्रशासकांद्वारे ज्या नियुक्त्या केल्या जातात त्या विश्वास निर्माण करण्यास विफल ठरतात. यामुळे अनेक नियुक्तिंच्या संदर्भात अधिशासित मंडळ किंवा कोलेजियम (समान हुद्दा आणि अधिकार प्राप्त अधिका-यांचा समुह) ची व्यवस्था केली गेली. यावेळी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग(एनएचआरसी) चे अध्यक्ष आणि सदस्य, मुख्य सतर्कता आयुक्त, सीआयसी आणि सूचना आयुक्त तसेच आता लोकपालाचे अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती कोलेजियम द्वारे केली जाणार आहे. यापैकी प्रत्येक नियुक्तीसाठी कोलेजियम वेग-वेगळ्या प्रकारे स्थापन करण्यात आले आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते प्रत्येक नियुक्तिशी जोडला गेला आहे. इथपर्यंत की एनएचआरसी साठी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते हे सुद्धा कोलेजियम चे सदस्य असतात.

पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचा कार्यकाळ समाप्त होणार आहे, त्यामुळे आता वेळ आली आहे की जेव्हा त्यांनी कोलेजियम व्यवस्थेला नष्ट करण्यासाठी जे काही केले त्याबाबत आत्मचिंतन करावे. त्यांनी स्पष्टवादाचा मुलामा चढविला परंतु ते अधिक राजकारणी राहिले. एनडीए शासनकाळात जेव्हा श्री अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान होते, त्यावेळी एक संधी आली होती, जेव्हा एका नियुक्ति वर दोन विरोधी पक्षनेत्यांनी असहमती दर्शवली होती. श्रीमती सोनिया गांधी आणि डॉ.मनमोहन सिंह यांनी एनडीए द्वारे नियुक्त एनएचआरसी च्या अध्यक्षांच्या नियुक्ति बद्दल असहमती दर्शवली होती. निश्चीतच एनएचआरसी च्या अध्यक्षांच्या रुपात न्यायमूर्ती जे.एस.वर्मा यांच्या नियुक्तिवर आपल्या नेत्यासह असहमती दर्शवणे हे डॉ. सिंह यांच्यासाठी अशोभनिय होते. त्यावेळी या पदासाठी न्यायमूर्ती वर्मा यांच्यापेक्षा चांगला आणखी कोणता उमेदवार नव्हता. त्यांची असहमती राजनैतिक दृष्टिकोनातून प्रेरित होती.

पंतप्रधानाच्या रुपातून ते सीवीसी च्या रुपात एका खराब छबी असलेल्या व्यक्तीला नियुक्त करणार होते. माझ्या सहयोगी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या श्रीमती सुषमा स्वराज यांनी यावर असहमती दर्शवली. त्यांच्या असहमतीला स्वीकार करताना सीवीसीच्या नियुक्तीला अमान्य करण्यात आले.

लोकपाल कायद्यात चार सदस्यांना पाचव्या सदस्याच्या नियुक्तसाठी अधिकार देण्यात आला आहे, चार सदस्यांचा अधिकार समितीच्या सात सदस्यांच्या स्थापनेसाठी सिमीत करण्यात आला आहे. राजीव गांधी फाऊंडेशन चे पदाधिकारी प्रसिद्ध विधिवेत्ते श्री मोहन गोपाल यांना शामिल करण्यात आले आहे. श्रीमती स्वराज यांनी सूचना केली होती की, उपलब्ध प्रसिद्ध विधिवेत्त्यांमधून सर्वश्रेष्ठ व्यक्ति ची नियुक्ति केली जाऊ शकते. त्यांनी माजी मुख्य न्यायाधीश श्री फली एस. नारीमन, श्री सोली सोराबजी, श्री के. पारासरन आणि श्री हरीश साल्वे यांच्या नावांची सूचना केली होती. श्रीमती स्वराज या न्यायमूर्ती एम.एन.वेंकटचेलैय्या आणि श्री के.के. वेणुगोपाल यांच्या नावावर सुद्धा सहमती दर्शवली होती. पंतप्रधान यांनी मन बनविले होते की फक्त श्री पी.पी.राव यांच्या नावावरच विचार केला जाईल. श्रीमती स्वराज यांच्याद्वारे सूचविण्यात आलेल्या कोणत्याच नावांवर विचार करण्यात आला नाही.

श्री पी.पी. राव आदरणीय व्यक्ति आहेत. पंतप्रधान यांच्या आडमुठी धोरणामुळेच कोणत्या दूस-या नावावर विचार करण्यात आला नाही आणि सरकारचा रस फक्त पी.पी.राव यांच्यात होता, ज्यामुळे मला त्यांच्या मनसुब्याबाबत शंका येते. कोलेजियम मध्ये कोणत्याही मुख्य न्यायाधीश किंवा त्यांच्या द्वारे मनोनीत न्यायाधीश असण्याचा हेतू संतुलन साधण्याचा आहे. साधारणतः वेग-वेगळ्या मतांना पाहता, मनोनीत न्यायाधीशांकडे अपेक्षा केली जाते की, ते काही उत्कृष्ट नावे समोर ठेवतील जे सर्व लोकांना स्वीकार असतील. मात्र असे झाले नाही.

पंतप्रधानांच्या रुपात डॉ. सिंह यांचा कार्यकाल लवकरच समाप्त होईल. विभिन्न संस्थांमध्ये अनेक सार्वजनिक पदांवर नियुक्ती करताना त्यांनी कोलेजियम ला नुकसान पोचवले. त्या लोकांपैकी एक असल्याने जो लोकपाल कायद्याचा मसुदा तयार करण्यात सक्रिय रुपात शामिल होते, मी आत्ममंथन करण्यास सुरु केले की लोकपालाच्या नियुक्ति ला उलथविण्यासाठी कोलेजियम व्यवस्थेला इतक्या सहजतेने नष्ट केले जाऊ शकते.

पंतप्रधानांनी या नियुक्तिच्या आधी लोकपाल सारख्या संस्थेला नुकसान पोचवलेले आहे.